<u>**प्रेसनोट दि.०८/०६/२०१९**</u>

<u>**सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे**</u>

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत अभिरुची पोलीस चौकीचे हद्दीतील तरंग सोसायटीमध्ये कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने जनजागृती**

---------------------------------------------------------------------------------------------

दि. ०७/०६/२०१९ रोजी सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत अभिरुची पोलीस चौकी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर शिंदे व पोलीस कर्मचारी यांनी कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने अभिरुची पोलीस चौकी हद्दीतील **"तरंग सोसायटी"** रहिवाशी यांची सदर बिल्डींगमध्ये जावुन बैठक आयोजीत केली. सदर मिटींगमध्ये पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटी पोलीसींग संदर्भात योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात उपस्थित रहिवाशी यांना माहीती सांगण्यात आली. सिंहगडरोड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रहिवाशांच्या सुरक्षेकरीता घरफोडी चोरी, चैन स्नैचींग, सायबरचे गुन्हे यासंदर्भात उपस्थित रहिवाशांना माहिती देवुन त्यांचे प्रश्न ऐकुन घेवुन त्यांचे समस्यांचे निराकरण करुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थित रहिवाशांना महिलांची व मुलांचे सुरक्षिततेबाबत योग्य त्या सुचना देण्यात आल्या. त्यांना महिलांचे मदतीसाठी पोलीस आयुक्तालयामध्ये असणाया भरोसा सेल बाबतची माहिती देण्यात आली. तसेच भरोसा सेल हेल्पलाईन नं. १०९१ बाबत माहिती देण्यात आली. आपल्या आजुबाजूस कोणी संशयीत व्यक्ती आढळल्यास ताबडतोब पोलीसांना कळविण्यात यावे याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. सदर मिटींगला २५ ते ३० रहिवाशी हजर होते.

